सन २०२५-२६ या वर्षाकरिता “मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा” कालावधी वाढविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२, E-१२६६३३३/यो-११**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ
फोर्ट, मुंबई ४०० ००१
**दिनांक : ३१ डिसेंबर, २०२५**

संदर्भ :

**ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२, E-११२३०५७/यो-११, दि.०६.०८.२०२५**

प्रस्तावना:

ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून प्रामुख्याने काम करणाऱ्या ग्रामपंचायतीस, कामगिरीनुसार प्रोत्साहित करुन त्यांची कार्यक्षमता वाढविण्याकरिता, उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून तालुका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य अशा चार स्तरांवर प्रोत्साहन देण्याकरिता राज्यात **“ मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान ”** राबविण्यास संदर्भाधिन शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

२. सदर अभियानाचा कालावधी संदर्भाधिन शासन निर्णयानुसार दि. १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर असा निश्चित करण्यात आला आहे व अभियानाचा शुभारंभ दि.१७.०९.२०२५ पासून झालेला आहे. तथापि, अभियानाच्या सुरुवातीच्या कालावधीत राज्यात उद्भवलेली पूरपरिस्थिती तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्यामुळे अभियानाच्या अंमलबजावणीवर मर्यादा आल्या आहेत. त्यामुळे, राज्यातील ग्रामपंचायतींना या अभियानात प्रभावी सहभागाची संधी मिळावी, अभियानांतर्गत सुरू असलेल्या उपक्रमांची पूर्तता करता यावी या दृष्टीने सन २०२५-२६ या वर्षाकरिता सदर अभियानाचा कालावधी वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

**सन २०२५-२६ या वर्षासाठी “मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज” अभियानाचा कालावधी दि. ३१ मार्च, २०२६ पर्यंत वाढविण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. सदर अभियानाचा कालावधी सन २०२५-२६ या वर्षाकरिता दि. १७ सप्टेंबर, २०२५ ते दि. ३१ मार्च, २०२६ असा राहील.**

२. सदर अभियानांतर्गत सन २०२५-२६ करिता सर्व स्तरांवरील मुल्यमापन कालावधी व प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख याबाबतच्या सुधारित सूचना स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

३. संदर्भाधिन शासन निर्णयातील इतर बाबी, अटी/शर्ती कायम राहतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२५१२३११३५७१३५४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(का.गो. वळवी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्य मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई,
८. सर्व मा.विधानपरिषद/विधानसभा सदस्य,
९. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
१०.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
११.प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांचे स्वीय सहायक, बांधकाम भवन, मुंबई,
१२.विभागीय आयुक्त, सर्व,
१३.जिल्हाधिकारी, सर्व,
१४.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व,
१५. निवडनस्ती यो-११.